प्रोप्रा.गायसमुद्रे 9527407701 8459953702
SM
एस.एम गारमेंट
शर्ट-पॅन्टचा कारखाना
पॅन्ट-शर्ट अरमानी शेरवानी सफारी
आमच्याकडे सर्व प्रकारचे ड्रेस एक तासात शिवून मिळतील
बीड रोड , न्यायालया समोर केज जि.बीड
प्रोप्रा.गायसमुद्रे मो.न.9527407701 8459953702
एक वेळ अवश्य भेट द्या

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार २ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३५१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता * समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता मो.न.9422660077

# एससी/एसटी आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय, राज्य सरकारला दिले अधिकार !

**काय आहे संपूर्ण प्रकरण....** खरेतर,१९७५ मध्ये पंजाब सरकारने अनुसूचित जातींसाठी राखीव जागांचे दोन वर्गात विभाजन करून आरक्षण धोरण आणले होते. एक बाल्मिकी आणि मजहबी शिखांसाठी आणि दुसरा उर्वरित अनुसूचित जाती प्रवर्गासाठी. हा नियम ३० वर्षे लागू राहिला. त्यानंतर, २००६ मध्ये, हे प्रकरण पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात पोहोचले आणि ईव्ही चिन्नय्या विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या २००४ च्या निर्णयाचा हवाला देण्यात आला. पंजाब सरकारला धक्का बसला आणि हे धोरण रद्द करण्यात आले. चिन्नय्या निर्णयात असे म्हटले होते की एससी श्रेणीमध्ये उपश्रेणींना परवानगी नाही. कारण हे समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन आहे. नंतर, २००६ मध्ये, पंजाब सरकारने बाल्मिकी आणि धार्मिक शीखांना कोटा पुन्हा मंजूर करण्यासाठी एक नवीन कायदा केला, ज्याला २०१० मध्ये पुन्हा उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. उच्च न्यायालयानेही हे धोरण रद्द केले. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले. पंजाब सरकारने असा युक्तिवाद केला की हे सर्वोच्च न्यायालयाच्या १९९२ च्या इंद्रा साहनी विरुद्ध भारत संघाच्या निर्णयानुसार मान्य आहे, ज्याने इतर मागासवर्गीय (ओबीसी) मध्ये उप-श्रेणींना परवानगी दिली होती. पंजाब सरकारने असा युक्तिवाद केला की अनुसूचित जातींमध्येही याची परवानगी असावी. २०२० मध्ये, सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने निरीक्षण केले की ईव्ही चिन्नय्या विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य या निर्णयाचा एका मोठ्या खंडपीठाने पुनर्विचार केला पाहिजे, ज्याने असे मानले होते की एससी श्रेणीतील उप-श्रेणींना परवानगी नाही. त्यानंतर, सीजेआयच्या नेतृत्वाखाली सात न्यायाधीशांच्या खंडपीठाची स्थापना करण्यात आली, ज्याने जानेवारी २०२४ मध्ये तीन दिवस या खटल्यातील युक्तिवाद ऐकला आणि त्यानंतर निर्णय राखून ठेवला.



**दिल्ली/विशेष**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. एससी, एसटी मध्ये आरक्षणासाठी वर्गीकरण करणं वैध आहे का यावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीमध्ये वर्गीकरण करणं योग्य असल्याचं सर्वोच्च न्यायालयाने ठरवलंय. वर्गीकरणाचे अधिकार हे राज्य सरकारला असणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायमूर्तींनी ६ विरुद्ध १ अशा बहुमताने हा निकाल दिलाय. बहुसंख्य मताने खंडपीठाने अनुसूचित जातीच्या उप-वर्गीकरणाच्या विरोधात निर्णय देणारा चिन्नैया खटल्यातील २००४ चा सुप्रीम कोर्टाचा निकाल रद्द केला. न्यायालयाने म्हटले आहे की अनुसूचित जाती आणि जमातींमध्ये उप-श्रेणी तयार केली जाऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाच्या सात सदस्यीय घटनापीठाने ६/१ अशा बहुमताने हा निर्णय दिला. यावर सरन्यायाधीशांसह ६ न्यायाधीशांचे समर्थन आहे. न्यायमूर्ती बेला त्रिवेदी याशी सहमत नाहीत, त्यांचे मत वेगळे आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने २००४ मध्ये दिलेला ५ न्यायमूर्तींचा निर्णय उलटला आहे. २००४ मध्ये दिलेल्या त्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींमध्ये उपश्रेणी निर्माण करता येणार नाहीत असे म्हटले होते. सात न्यायमूर्तींच्या घटनापीठातील न्यायमूर्ती बीआर गवई यांनी सामाजिक लोकशाहीच्या आवश्यकतेवर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषणाचा दाखला दिला. न्यायमूर्ती गवई म्हणाले की, मागासवर्गीयांना प्राधान्य देणं राज्याचं कर्तव्य आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती वर्गातील काही लोकच आरक्षणाचा फायदा घेत आहेत. तळागाळातील परिस्थिती नाकारता येत नाही, एससी, एसटीमध्येही असे वर्ग आहेत ज्यांना शतकांपासून छळाचा आणि इतर समस्यांचा सामना करावा लागत आहे. सर्वोच्च न्यायालयाने २००४ च्या निर्णयात काय म्हटले होते? २००४ च्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, आरक्षण देण्यासाठी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या उप-श्रेणी तयार करण्याचा अधिकार राज्यांना नाही. सर्वोच्च न्यायालयासमोर पुन्हा एकदा मुख्य मुद्दा आहे तो एससी आणि एसटी प्रवर्गातील उप-श्रेणी (कोटामधील कोटा) हा. आता न्यायालय सांगेल अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गांना उपप्रवर्गात आरक्षण मिळेल की नाही? राज्य विधानमंडळांना कोट्यातील कोटा लागू करण्याचा अधिकार आहे की नाही?




## साने गुरुजी निवासी विद्यालय, केज येथे मतदान प्रक्रिया द्वारे शालेय प्रतिनिधीची निवड करण्यात आली

**केज/प्रतिनिधी** बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ, केज संचलित साने गुरुजी निवासी प्रा.मा.उच्च माध्यमिक विद्यालय केज येथे विद्यार्थ्यांना लोकशाही पद्धतीत मतदानाचे महत्व व प्रत्यक्ष माहिती व्हावी या करिता भारतीय लोकशाही प्रणाली प्रमाणे शालेय विद्यार्थी प्रतिनिधीची निवडणूक पार पडली.शालेय निवडणूक प्रक्रिया निवडणूक आयोग ज्या पद्धतीने निवडणूक घेतात त्याच प्रमाणे ही निवडणूक घेण्यात आली. सर्वप्रथम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी तीन दिवसाचा अवधि देण्यात येऊन उमेदवारी अर्ज मागे घेणे,अर्जाची छाननी करने,वैध उमेदवाराची यादी निवडणूक चिन्हासह घोषित करणे,उमेदवाराला प्रचार करण्यासाठी विहित कालावधी देण्यात आला. मतदानादिवशी मतदान केंद्रात मतदान केंद्राध्यक्ष व मतदान प्रतिनिधी यांच्या देखरेखीखाली पुर्ण मतदान प्रक्रिया पार पाडली.साने गुरुजी निवासी प्रा. मा.उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कविताताई गित्ते/कराड मॅंडम यांनी मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून चोख भुमिका बजावली झालेल्या मतदानाची मतमोजणी होऊन निकाल घोषित करण्यात आला. यात विजयी उमेदवार पुढील प्रमाणे,शालेय प्रतिनिधी पुरुष गट चि.तिडके ओमकार सुभाष, महिला प्रतिनिधी कु.चौरे प्रांजली चंद्रसेन, सांस्कृतिक प्रतिनिधी चि.मुंडे हनुमंत निवृत्ती, कु.नाईकवाडे दिपाली विनायक, क्रीडा प्रतिनिधी चि.फड निवृत्ती तुषार, कु. सांगळे अमृता पंडित, व स्वच्छता प्रतिनिधी म्हणून कु.मैंद प्रतिक्षा रामनाथ हे विजयी झाले. ही मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी तरकसे सर, पवार सर, सिरसट मॅडम, जोशी मॅडम, यांनी परिश्रम घेऊन पुर्ण मतदान प्रक्रिया पार पाडली. विजयी उमेदवारांना संस्थेचे अध्यक्ष एड. उद्धवराव कराड साहेब, उपाध्यक्ष राजेशजी कापसे सर, प्रा.डॉ. कविताताई कराड मॅंडम यांनी सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.

## शाम माध्यमिक,उच्च माध्य.कला व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी...

**केज /प्रतिनिधी**

केज तालुक्यातील दहिफळ (वड.) येथे लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती शाम माध्यमिक , उच्च माध्यमिक कला व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात दहिफळ (वड.) येथे उत्साहात साजरी करण्यात आली. याबाबत सविस्तर वृत्त असे की दि.०१/०८/२०२४ रोजी महाविद्यालयात लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी तर साहित्यरत्न लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव श्री.शरद बप्पा गदळे




तसेच प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ.शशिकांत दहिफळकर व शाळेच्या प्राचार्या जयश्री ईप्पर मॅडम होत्या. प्रथम:ता सर्व मान्यवरांच्या हस्ते महापुरुषाचे धूप-दिप-पुष्पाने पुजन करण्यात आले . त्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी दोन्ही महापुरुषांच्या विचारांन वरती आपआपले मनोगत व्यक्त केले. तसेच प्रमुख पाहुण्यांच्या मनोगतामध्ये महापुरुषांचे विचार आत्मसात करून समाजात रुजवणे गरजेचे आहे असे मत संस्थेचे अध्यक्ष डॉ.शशिकांत दहिफळकर यांनी व्यक्त केले शेवटी अध्यक्षीय समारोप संस्थेचे सचिव श्री.शरद बप्पा गदळे यांनी " महापुरुषांचे विचार भारत देशास सक्षम बनवणारे " यावर सखोल मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रमाचे प्रस्ताविक महाविद्यालयाचे उपप्रचार्य श्री. गंदगे आर.व्ही यांनी तर सुत्रसंचालन श्री. भालेराव डी.ए. यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सोळंके पी.एस., गपाट एम.टी, गायकवाड एम.जी.,.राऊत टी. एम., मुंडे बी. एम., भालेराव डी.ए., कुटे व्ही. व्ही., सिरसाट एम. एस., खेडकर एच. बीं.,मुंडे एस. पी.,खाडे ए. एस.,कदम मॅडम,मेहेत्रे मॅडम ,नागरगोजे आर. आदि शिक्षक ,कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तथा मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

### संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त

## सर्व जाती धर्माच्या 1182 जणांचे रक्तदान

माजलगाव - संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सकल मराठा समाज माजलगाव च्या वतीने दि.१ गुरुवार रोजी आपले पाटील नेतृत्व नेक, प्रत्येकाने झाडे लावा एक या अनुषंगाने तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये मराठा समाजाच्या बांधवांनी एक झाड लावण्याचे व रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरामध्ये सर्व जाती धर्माच्या ११८२ जणांनी रक्तदान केले. एक ऑगस्ट रोजी मराठा आरक्षण चळवळीचे नेते संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवसानिमित्त सकल मराठा समाज माजलगाव च्या वतीने माजलगाव मध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये आपले पाटील नेतृत्व नेक, प्रत्येकाने झाडे लावा एक या अनुषंगाने मराठा समाजाने सार्वजनिक ठिकाणी, आपल्या शेतात, आपल्या परिसरात, गावात एक झाड लावून मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस साजरा केला. माजलगाव तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या प्रत्येक बांधवांनी या अभियानामध्ये सहभागी होऊन पाटील यांना वाढदिवसाच्य शुभेच्छा दिल्या तर शहरातील काव्य हाइट्स येथील वरच्या मजल्यावर सकल मराठा समाजाच्या संपर्क कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते या रक्तदान शिबिरामध्ये सर्व जाती धर्माच्या ११८२ जणांनी रक्तदान केले. या कार्यक्रमाचे आयोजन सकल मराठा समाज माजलगावच्या वतीने केले होते.
----

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून ऑलिंपिकवीर स्वप्नील कुसाळेच्या कुटुंबियाचे अभिनंदन



### कांबळवाडीतील कुटुंबियांशी साधला दुरध्वनीवरून संपर्क

**मुंबई/प्रतिनिधी**

नेमबाज स्वप्नील कुसाळे आपल्या महाराष्ट्राचा अभिमान आहे. स्वप्नीलच्या पुढील वाटचालीसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वप्नीलचे वडील सुरेश कुसाळे यांना सांगितले. पॅरीस ऑलिंपिक २०१४ मध्ये नेमबाजीत कांस्य पदकाचा वेध घेणाऱ्या स्वप्नीलच्या कुटुंबियांचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून अभिनंदन केले. कुसाळे कुटुंबियांच्या पाठिंब्यामुळेच स्वप्नील या यशापर्यंत पोहचू शकला आहे. त्याच्या गेल्या १२ वर्षांच्या मेहनतीमुळे देशाला आणि राज्याला क्रीडा क्षेत्रातील महत्वपूर्ण असे यश मिळाले आहे. या यशासाठी कुसाळे कुटुंबियांसह, स्वप्नीलला शालेय जीवनापासून ते नेमबाजीत करिअर करण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या गुरुजन, प्रशिक्षक, मार्गदर्शक अशा सर्वांचे योगदान निश्चितच महत्वाचे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. स्वप्नीलमुळे कुस्तीमध्ये भारतासाठी वैयक्तिक पहिले पदक पटकावणाऱ्या खाशाबा जाधव यांची आठवण झाली. स्वप्नीलच्या या कामागिरीने महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात उत्साह, आनंदाचे उत्साह निर्माण झाले आहे. कांबळवाडी ते पॅरीसमध्येली ऑलिंपिक पदाला गवसणी हा स्वप्नीलचा प्रवास क्रीडा क्षेत्रात येऊ पाहणाऱ्या होतकरू खेळाडूंसाठी प्रेरणादायी असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. तसेच यापुढेही स्वप्नीलच्या वाटचालीसाठी आवश्यक असे सर्व ते सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही दिली.

# जि. प. प्रा. शाळा शिरापुर धुमाळ येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती, व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी

## व संघर्ष योद्धा श्री मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला

**शिरूर प्रतिनिधी .**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिरपूर धुमाळ येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व संघर्ष योद्धा श्री मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस अत्यंत उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली .यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री गोरक्षनाथ बहिर मुख्याध्यापक श्री सोनवणे सर व गावातील ज्येष्ठ नागरिक सखाराम नाना बहिर आयु अंकुश औसरमल श्री मनोहर काका गायकवाड व तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या



सामाजिक कार्याचा उजाळा आदरणीय श्री घोडके सरांनी केला. व नवनिर्वाचित आदर्श शिक्षक श्री राजेश उगले सर यांचा शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. व संघर्ष योद्धा श्री मनोज जरांगे पाटलांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री घोडके सरांनी केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक मुख्याध्यापक श्री सोनवणे सर यांनी केले .लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली .तसेच गावातील युवकांनी सुद्धा लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांची माहिती सांगितली .शाळेतील मुलांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची माहिती सांगितली .कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री गोरक्षनाथ बहिर यांनी विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांनी केलेल्या कार्याची माहिती सविस्तर सांगितली . शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री अंबादास गायकवाड यांनी केले .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक शिक्षिका शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष सदस्य व गावातील जेष्ठ नागरिक युवक मित्र परिवार यांनी मोलाचे सहकार्य केले शेवटी शाळेच्या वतीने सर्वांचे आभार व्यक्त केले.

# बीड नगर परिषदेने २०१३-१४ पर्यंतचे जन्म दाखले देऊन विद्यार्थ्यांची गैरसोय टाळावी

**बीड प्रतिनिधी ,**
सध्या जवाहर नवोदय विद्यालय, स्कॉलरशिप व सैनिकी विद्यालयचे प्रवेश परीक्षेचे फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरु झालेली असून त्यासाठी विदयार्थ्यांना विविध कागदपत्रे लागत आहेत. या वर्षी जवाहर नवोदय विद्यालयाचा परीक्षा फॉर्म भरण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन जन्म प्रमाणपत्र आवश्यक केलेले आहे. साधारणत :ज्या विदयार्थ्यांचा जन्म 2013-2014 या कालावधीतील असून ते इयत्ता 5 वी च्या वर्गात आहेत त्यांना ही परीक्षा देता येते. त्यासाठी विद्यार्थ्यांचा ऑनलाईन जन्म दाखला आवश्यक आहे. तो मिळवण्यासाठी अनेक पालक गेल्या पंधरा दिवसापासून बीड नगर परिषद मध्ये चकरा मारत आहेत, परंतु नगर परिषदेच्या कर्मचाऱ्याकडून फक्त 2016-2024 पर्यंत चेच जन्म दाखल्याचे सॉफ्टवेअर चालू आहे, तुम्ही आठ दिवसांनी या असे सांगितले जाते, पुन्हा आठ दिवसांनी गेल्यानंतर ही सॉफ्टवेअर सूरु झाले नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पालकांना निराश होऊन परत जावे लागत आहे. दर आठ दिवसाला बीड नगर परिषदे मध्ये पालक चकरा मारून कंटाळले आहेत.आज एक दोन पालकांनी मा. मुख्याधिकारी साहेब नगर परिषद बीड यांची भेट घेऊन 2013-2024 चे सॉफ्टवेअर सुरु करून विदयार्थ्यांची होणारी गैरसोय टाळावी अशी तोंडी विनंती केली. आम्ही जिल्हा परिषदेला तशी तक्रार नोंदवली आहे, त्यांनी सॉफ्टवेअर् सुरु केले की आम्ही जन्म दाखले देऊ असे त्यांनी सांगितले. पालक वर्गात मात्र चिंतेचे वातावरण आहे कारण या स्पर्धा परीक्षांचे फॉर्म भरण्याच्या कालावधीत 2013-2014 चे जन्म दाखले देण्याचे सॉफ्टवेअर सूरू झाले तरच विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्मस भरता येणार आहेत. त्यामुळे मा. नगराध्यक्ष साहेब, सर्व नगरसेवक व मा. मुख्याधिकारी साहेबांनी जातीने लक्ष घालून सदरील सॉफ्टवेअर तात्काळ सुरु करून विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळावे, व पालकांची होणारी धावपळ थांबवून येत्या आठ दिवसात शासनाच्या ज्या विभागाकडे हे सॉफ्टवेअर सुरु करण्याचे अधिकार आहेत त्यांच्या कडे पाठ पुरावा करून सदरील कालावधीतील जन्म झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना त्यांचे जन्म दाखले उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी पालक वर्गातून होत आहे ,

# उमरा येथे आण्णा भाऊ साठे जयंती साजरी

**नांदेड प्रतिनिधी**



नांदेड : लोहा तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय उमरा येथे साहित्यकार कवी प्रबोधनकार संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे प्रणेते लोकशाहीर लोकसाहित्य अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली.प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ.राजेश पाटील सिरसाट,मारोती पवळे,ग्रामपंचायत सदस्य सुनील सोनटक्के,मुबिन शेख,राजेश शिरवंदे,नितीन सिरसाट,दत्ता माडेवार आदी उपस्थित होते.

# ३ लाख ४४ हजार ८७६ लाभार्थ्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये अर्ज दाखल

**बीड :- (प्रतिनीधी )**
बीड, 1 : बीड जिल्ह्यामध्ये आतापर्यंत 3 लाख 44 हजार 876 महिलांनी मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण या योजनेमध्ये ऑनलाईन तसेच ऑफलाइन अर्ज दाखल केले आहेत. महसूल पंधरवाडा निमित्त जिल्हाधिकारी कार्यालय आणि महिला व बालविकास यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये लाभार्थी महिलांची नोंदणी आणि अर्जाची पडताळणी करण्याची विशेष मोहीम आयोजित करण्यात आली आहे. या अंतर्गत प्रत्येक तालुक्यात तालुकास्तरीय समितीमार्फत ऑनलाईन अर्जांची छाननी सुरू करण्यात आली आहे. 13662 अर्जांना स्वीकृती देण्यात आली आहे. ज्यांच्या ऑनलाईन अर्जात कागदपत्राच्या बाबतीत काही त्रुट्या आढळून आले आहेत. त्यांच्या मोबाईलवर मेसेज जात आहे. अश्या अर्जदार महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत नारी शक्ती दूत ॲपच्या माध्यमातून ज्या मोबाईल ॲप वरून ऑनलाइन अर्ज भरला आहे त्या मोबाईल मधून अर्ज एडिट करून अर्जाची त्रुटी पूर्तता पूर्ण करून घ्यावी. ज्या महिला अर्जदारांनी अर्जासोबत आवश्यक सर्व कागदपत्रे जोडलेले आहेत त्यांचे अर्ज अप्रूव्ह करण्यात येत आहेत. व तसा संदेश महिला अर्जदारांच्या मोबाईलवर जात आहे अप्रुव्हड असा संदेश आल्यास आपला अर्ज यशस्वीरिता भरला गेला असल्याचे कळते. तथापि ज्या महिला अर्जदारांना आपला अर्ज partially rejected असा दूरध्वनी संदेश आलेला आहे त्यांनी नारी शक्ती दूत ॲपच्या माध्यमातून ज्या मोबाईल ॲप वरून ऑनलाइन अर्ज भरला आहे त्याच मोबाईल ॲप मधून अर्ज एडिट करून अर्जाची त्रुटी पूर्तता पूर्ण करून घ्यावी असे आवाहन, जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले असल्याचे कळविले आहे.

# लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी स्वखर्चाने संरक्षक कुंपण बांधुन वृक्षारोपण केले

**लिंबागणेश(प्रतिनिधी)**
लिंबागणेश:-( दि.१ ) जागतिक तापमान वाढीच्या दरासाठी बेसुमार वृक्षतोड हि फार मोठी समस्या बनली असुन तापमानाचे नियमन आणि पावसाला पोषक हवामान बनवण्यासाठी झाडे महत्वाची भुमिका बजावत असुन कोरोना कालावधीत झाडांचे महत्त्व काय असते हे सर्वांनी जाणले असल्याने प्रत्येकाने झाडे लाऊन झाडांचे संगोपन करणे गरजेचे असुन वृक्षारोपण काळाची गरज असल्याचे मत व्यक्त करत आज दि.१ ऑगस्ट गुरुवार रोजी लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात वृक्षारोपण करण्यात आले. केवळ वृक्षारोपण नव्हे तर संगोपनासाठी वैद्यकीय अधिकारी रूपाली चिटकुलवार आणि त्यांचे



प्राथमिक आरोग्य केंद्रातील सहकारी यांनी स्वखर्चाने तारेचे संरक्षक कुंपण तयार करूनच वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी चिंच ,पिंपळ,आंबा, बदाम ,चिकु,गुलमोहर ,सिसम तसेच फुलझाडे लावण्यात आली.यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी लोखंडे, गर्जे, कंचार,उपकेंद्रातील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.जाधव, डॉ.कोठावळे,डॉ. राऊत,आरोग्य सेविका गिरे, शिंदे,चौरे, क्षीरसागर, वीर,आरोग्य कर्मचारी वीर, कदम, गायकवाड,सापते लांडगे प्रयोग शाळा तंत्रज्ञ, दत्तात्रेय झोडगे वाहन चालक आणि परिचर सुरेश आवसरे वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी होते. स्वखर्चाने संरक्षक कुंपण करून वृक्षलागवड करणा-या वैद्यकीय अधिकारी डॉ . रुपाली चिटकुलवार आणि कर्मचाऱ्यांचा ग्रामपंचायत मार्फत सत्कार लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ.रूपाली चिटकुलवार यांनी वृक्षारोपणाबरोबरच त्यांच्या संगोपनासाठी संरक्षक करणे आवश्यक असल्याने स्वतः २० हजार रुपये खर्चून तारेची संरक्षक कुंपण आणि लोखंडी गेट बसवले तसेच ईतर कर्मचाऱ्यांनी जवळपास ५००० रूपये खर्चून लागवडीसाठी वृक्षाची रोपे खरेदी केली. यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सुशोभिकरणात भर पडणार असुन या कौतुकास्पद उपक्रमाबद्दल ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात,ग्रां.स. रमेश गायकवाड, पत्रकार हरिओम क्षीरसागर आणि डॉ.गणेश ढवळे यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ.रुपाली चिटकुलवार आणि कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

# युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत 2 ऑगस्टला ऑनलाईन व ऑफलाईन नोंदणीचे आयोजन

**बीड**, दि.1 : महसूल पंधरवाडा निमित्त, जिल्हाधिकारी कार्यालय व कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या संयुक्त विद्यमाने युवा कार्य प्रशिक्षण योजनाकरिता बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी, पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण उमेदवारांकरिता ऑनलाईन व ऑफलाइन नोंदणीचे आयोजन शुक्रवार दिनांक 02 ऑगस्ट रोजी करण्यात आलेले आहे.

जिल्ह्यातील विविध शासकीय व खाजगी आस्थापना, सहकारी बँक इत्यादी मध्ये सहा महिने ऑन जॉब ट्रेनिंग घेणे करिता नोंदणी सुरू आहे. यामध्ये नोंदणी केल्यानंतर आस्थापनेच्या आवश्यकतेप्रमाणे निवड झाल्यास बारावी उत्तीर्ण उमेदवारांना दरमहा 6000/-, आयटीआय व डिप्लोमा करिता 8000/-, पदवी व पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण बेरोजगारांकरिता 10000/- मानधन/ विद्या वेतन पुढील सहा महिने सदर कार्यालयात, आस्थापनेत, कंपनीत, बँक मध्ये पंजाब प्रशिक्षण पूर्ण केल्यास प्रशिक्षणसह प्रमाणपत्र देण्यात येईल. येथे होईल ऑनलाइन व ऑफलाइन नोंदणी

याकरिता दिनांक 2 ऑगस्ट 2024 रोजी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बीड , आयटीआय परिसर चंपावती शाळेच्या मागे नोंदणी करिता 11 ते 05 या वेळेत सर्व कागदपत्रासह उपस्थित राहण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त, श्री सुशील उचले, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बीड यांनी केली आहे. अधिक माहितीसाठी Beedskill या फेसबुक पेजला भेट द्यावी.



**संघर्ष योद्धा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त जरांगे पाटील यांना दीर्घायुषी मिळावे म्हणून आज माजलगाव मूकबधिर शाळा येथे फळं वाटप व शालेय साहित्य वाटप करून वृक्ष लागवड करण्यात आली. सकल मराठा समाज माजलगाव यांच्या वतीने उपक्रम राबविण्यात आला**

# महसूली अधिकारी कर्मचाऱ्यांवर राज्य शासनाचा अधिकचा विश्वास: जिल्हाधिकारी

**बीड,** दि.1 : महसुली अधिकारी कर्मचाऱ्यांवर राज्य शासनाचा अधिकचा विश्वास असल्याने कुठले आहे महत्त्वकांक्षी शासकीय योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांची सेवा शासन घेत असते असे, गौरव उद्गार जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी महसूल दिनाच्या कार्यक्रमानिमित्त प्रतिपादित केले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात महसूल दिनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले त्यावेळी श्री पाठक बोलत होते. या कार्यक्रमास प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी,उपविभागीय अधिकारी कविता जाधव, ओंकार देशमुख उपस्थित होते.

महसूल दिनानिमित्त दूरदृष्टी प्रणालीच्या माध्यमातून महसूल दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. उपमुख्यमंत्री अजित पवार महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमास विभागीय आयुक्त, सर्व जिल्ह्यांची जिल्हाधिकारी ऑनलाइन उपस्थित होते. या कार्यक्रमास बीड जिल्ह्यातील महसूल अधिकारी कर्मचारी उपस्थित ऑनलाइन उपस्थित होते. मंत्री महोदयांचे मार्गदर्शन सर्वांनी एकले.

तत्पूर्वी जिल्ह्यातील महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी ही पाठक म्हणाले, महसूलचे कर्मचारी हे शासनाचे हुकुमी एक्के असल्याने त्यांच्याकडून राज्यस्तरावरील महत्त्वाच्या योजनांची अंमलबजावणीचे कार्य केले जाते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना जिल्ह्यातील महिला भगिनींसाठी उपयोगी ठरणारी योजना असल्याने ज्या महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांना याबाबतची जबाबदारी सोपवलेली आहे त्यांनी ही जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडतील असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांना गोरगरिबांची सेवा करण्याची संधी आपल्या कामानिमित्त मिळत असते त्यामुळे त्यांना गरजू लोकांचे अप्रत्यक्षपणे आशीर्वादही मिळतात, असेही ते यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाची प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले, महसूल दिनाचे महत्त्व उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी सांगितले, अन्न व नागरी पुरवठा विभागातील योजनांची माहिती उपविभागीय अधिकारी ओमकार देशमुख यांनी दिली. या कार्यक्रमास तहसीलदार, नरेंद्र कुलकर्णी, तेजस्विनी जाधव, अविनाश शिंगटे, सहाय्यक निबंधक श्री. आटूळे यांच्यासह नायब तहसीलदार, महसूलचे कर्मचारी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते.

# गुरुनानक प्राथमिक विद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

**कैज /प्रतिनिधि**

श्री विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी सांगवी ता. केज जि. बीड संचालित गुरुनानक प्राथमिक विद्यालय,शाहूनगर,बीड येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी तसेच लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली.या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्रीमती पवार एस. ए. प्रमुख वक्ते श्री गदळे आर. ए. ,श्री तांदळे ए. ए. , श्री ठोकरे एम. व्ही. या मान्यवरांनी लोकमान्य टिळक आणि अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन केले. मान्यवरांचा विद्यार्थ्यांच्या हस्ते छोटेखानी



सत्कार समारंभ पार पडल्यानंतर शाळेचे विद्यार्थी वनवे कृष्णा, अमृता जाधव, शिंदे शरयू, सय्यद अश्मिरा, पवार तनुजा, आंधळे सृष्टी, शिंदे रुद्र, आडे आराध्या, सोनवणे श्रीनिवास, गिरी नारायण, स्वामी अनुजा, साठे भावेश, गदळे अनुष या विद्यार्थ्यांनी दोन्हीही समाजसुधारकांविषयी आपली उत्स्फूर्त मनोगते व्यक्त केली आणि उपस्थितांची मने जिंकून घेतली.

त्यानंतर प्रमुख मार्गदर्शक श्री तांदळे सर यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्याविषयी त्यांचे बालपण,शिक्षण तसेच भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान याबद्दल सखोल विवेचन केले. त्यानंतर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्याबद्दल तत्कालीन प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत तग धरून संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महत्वाचा वाटा उचलून,आपल्या साहित्यातून गरीब,शेतकरी,दलीत,कष्टकरी यांच्या व्यथा मांडून मराठी साहित्यास श्रीमंत केले.त्यांच्या जीवनातील कथा सांगत सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री गदळे सर यांनी स्वातंत्र्यपूर्व परिस्थितीचा आढावा घेत दोन्ही महापुरुषांच्या विचारांचा समन्वय साधत महापुरुषांनी समाजहितासाठी केलेल्या कामामुळे,त्यांच्या त्यागामुळे आपण त्यांच्यापासून प्रेरणा घेण्यासाठी या जयंती आणि पुण्यतिथी आयोजित करायला हव्यात असे वास्तवदर्शी विवेचन केले. विद्यार्थ्यांना संपूर्ण कार्यक्रमाचे नेमके आकलन कितपत झाले हे पाहण्यासाठी आपल्या अध्यक्षीय समारोपात शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पवार मॅडम यांनी विद्यार्थ्यांना प्रसंगोचीत प्रश्न विचारत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाच्या अखेरीस सर्वसमावेशक आभार शाळेचे ज्येष्ठ शिक्षक श्री. तेलप आर.बी. यांनी मानत मनोगते व्यक्त केलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती डोंगरे यू.एम.यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्रीमती हांगे मॅडम तसेच श्रीमती पव्हणे मॅडम यांनी सहकार्य केले

## वसुंधरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पैठण येथे लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात संपन्न




**प्रतिनिधी/सचिन भालेराव**

वसुंधरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पैठण येथे लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली प्रथमता वसुंधरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पैठण विद्यालयाचे प्राचार्य गायकवाड एस .पी सर यांच्या हस्ते प्रतिमेचे पुजन करण्यात आले याप्रसंगी उपमुख्याध्यापक चौधरी ए . एन सर त अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर संगित विषयाचे प्रा प्रसाद कुलकर्णी सर यांनी अण्णाभाऊ साठे लिखित “माझी मैना गावाकड राहिली ‘ ही छक्कड याचे उत्तम गायन केले या गिताने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे हुबेहुब चित्र विद्यार्थ्यांच्या समोर उभा केले मुलांमध्ये प्रचंड उत्साह संचारला अध्यक्षीय समारोप करताना विद्यालयाचे प्राचार्य गायकवाड एस पी साहेब यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या कार्याविषयी माहिती दिली त्यांच्या कार्याचा सर्वांनी आदर्श घ्यावा असे ते म्हणाले तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीतील विद्यार्थी चि. चौधरी सुरज रमेश याने केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन इयत्ता नववीतील विद्यार्थ्यानी कु . चौधरी सानिका दिलीप हीने केले यावेळी प्राध्यापक प्राध्यापिका, शिक्षक , शिक्षीका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने

# महसूल पंधरवडा आणि पशुसंवर्धन पंधरवड्यामध्ये योजनांचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवा --मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## महसूल विभागाने अधिक लोकाभिमुख होऊन काम करावे- उपमुख्यमंत्री

**यावेळी मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी व उपक्रमामध्ये महसूल विभागाचे चांगले योगदान आहे. समाजातील प्रत्येक घटक यामध्ये सहभागी होत आहे. महसूल विभागाने लोकाभिमुख होत अधिक गतीमान पद्धतीने काम करावे. समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचून सर्वांच्या एकत्रित प्रयत्नाने महसूल पंधरवडा यशस्वी होईल. पोलीस विभागाच्या धर्तीवर महसूल विभागास देखील जिल्हा नियोजन समितीतून वाहने खरेदीचा निर्णय घेण्यात येत आहे असे उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, संगणकीकरणामुळे शासकीय कार्यालयात येण्याची गरज कमी झाली आहे. ग्रामीण भागात महसूल व पशुसंवर्धन विभाग दोन्ही महत्त्वाचे आहेत. भारतात दुग्ध उत्पादनाचे प्रमाण इतर देशांच्या तुलनेत कमी आहे, परंतु पशूंची संख्या जास्त आहे. शेतकरी व दूध उत्पादक यासह सर्वसामान्यांची सेवा करण्याचे उद्दिष्ट ठेवून काम केले जावे असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.**




***मुंबई प्रतिनिधी:**

मुंबई दि.१;--यावर्षीपासून महसूल सप्ताह ऐवजी ‘महसूल पंधरवडा’ तसेच ‘पशुसंवर्धन पंधरवडा’ साजरा होत आहे. या कालावधीत शासन आपल्या दारी उपक्रमाच्या धर्तीवर शासनाच्या विविध योजना जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत लाभ पोहोचवा. वयोश्री, लेक लाडकी, अन्नपूर्णा, मुख्यमंत्री माझी लाडके बहीण तसेच शेतकऱ्यांशी संबंधित विविध योजनांची चांगली अंमलबजावणी करून शासनाची चांगली प्रतिमा निर्माण करावी असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

राज्यस्तरीय महसूल दिन तसेच महसूल पंधरवडा व पशुसंवर्धन पंधरवडा-२०२४ चा शुभारंभ कार्यक्रम मंत्रालयातील परिषद सभागृह येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महसूल आणि पशुसंवर्धन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार यांची प्रमुख उपस्थिती तसेच दूरदृष्यप्रणालीद्वारे सर्व विभागीय आयुक्त , सर्व जिल्हाधिकारी आणि पशुसंवर्धन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थित होती.

यावेळी संवाद साधताना मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, महसूल पंधरवाडा व पशुसंवर्धन पंधरवाडा दोन्हीसाठी नागरिकांना शुभेच्छा देताना आनंद होतो आहे. नागरिक व ग्रामीण भागातील जनतेसाठी महसूल व पशुसंवर्धन देखील अतिशय महत्त्वाचे विभाग आहेत. महसूल पंधरवड्यामध्ये शासनाची प्रतिमा उंचावण्यासाठी महसूल विभागाने अग्रेसर राहून सर्व विभागांसह चांगले काम करावे.

ते पुढे म्हणाले, कृषी, आरोग्य, सिंचन, जलसंपदा, सहकार यासह अन्य सर्व विभागांना एकत्र घेऊन काम करावे. अधिकाऱ्यांनी अधिक गतीमान, परस्पर समन्वय साधून नागरिकांची कामे वेळेत करण्यासोबत शासनाच्या योजना जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवून लोकाभिमूख काम करावे. जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व ग्रामस्तरीय अधिकारी, कर्मचारी लोकांपर्यंत जावे.

मुख्यमंत्री म्हणाले, पंधरवडा निमित्त सर्व विभाग एकत्र येऊन काम करत असले, तरी शासन नेहमीच नागरिकांसाठी 24x 7 काम करत आहे. आपण या निमित्ताने विविध योजना लोकांपर्यंत नेऊन शासनाची चांगली प्रतिमा निर्माण करावी. पशुसंवर्धन पंधरवडामध्ये राज्यातील दूध भेसळीसारख्या महत्त्वाच्या प्रश्नावर अतिशय कठोर काम केले जावे. भेसळ करणाऱ्यांना जरब बसेल यासाठी मोका(MPDA)सारखी कारवाई करावी. महसूल विभागाने सर्व यंत्रणच्या सहकार्याने दाखले व विविध योजनांचे लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अगदी गाव पातळीवर जाऊन काम करावे. वयोश्री योजना, अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण यासह शेतकऱ्यांसाठी असलेल्या अनेक योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहन या निमित्ताने मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी केले.

**शासनाच्या योजना व धोरण पोहोचवावेत--महसूलमंत्री**

महसूलमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, पंधरवाड्याच्या उपक्रमामध्ये सर्व नागरिकांपर्यंत शासनाच्या योजना व धोरण पोहोचवावेत उपक्रम राबवताना पालकमंत्री, आमदार , लोकप्रतिनिधी यांचा सहभागाने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. विविध उपक्रमांच्या निमित्ताने सैनिकांचे कुटुंबीय, महाविद्यालयीन युवक, वयोवृद्ध नागरिक , महिला समाजातील विविध घटक यांना सामावून घेत महसूल पंधरवड्याचा हा उपक्रम यशस्वी करावा. पशुसंवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने राज्यातील दूध भेसळ या विरोधात कारवाई केली जावी. प्रास्ताविकात अपर मुख्य सचिव श्री. राजेशकुमार यांनी महसूल पंधरवड्याच्या आयोजनाचे महत्व सांगून या उपक्रमाचा तपशीलवार माहिती दिली.

०००००

# पाटोदा तहसीलचे नायब तहसीलदार बन व तसेच मंडळ अधिकारी नागरगोजे यांना सेवा निवृत्ती मुळे निरोप

**पाटोदा/प्रतिनिधी**

पाटोदा तहसील मध्ये कार्यरत असलेले नायब तहसीलदार संतोष बण व तसेच मंडळ अधिकारी पांडुरंग नागरगोजे यांचे सेवानिवृत्तीमुळे तहसील कार्यालयातर्फे दोघांचाही सपत्नीक सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला पाटोदा तहसील मध्ये संतोष बंण हे काही काळ तहसीलदार पदी कार्यरत होते त्यांचे कार्य उल्लेखनीय असे होते पाटोदा तहसीलदार पदी निलावडे यांची नियुक्ती झाल्यामुळे संतोष बण यांच्याकडे तहसील पुरवठा अधिकारी म्हणून कार्यभार सोपवण्यात आला पुरवठा विभागात त्यांचे काम हे चांगले होते कोणाचीही त्यांनी अडवणूक केली नाही त्यांच्या



कामाबद्दल सर्व कर्मचारी तसेच नागरिक समाधानी होते विशेष म्हणजे बण हे पाटोदा तालुक्यातील जवळाला येथील रहिवासी असल्याने त्यांनी पाटोदा वासियांची काम हे मन लावून केली त्याचप्रमाणे पाटोदा येथील येवलवाडी येथे रहिवासी असलेले पांडुरंग नागरगोजे सध्या मंडळ अधिकारी म्हणून काम पाहत होते त्यांचे पाटोदा येथील तलाठी म्हणून काम हे सुद्धा उल्लेखनीय होते त्यांनी कधीही कोणाचीही अडवणूक केली नाही त्यांच्या सेवनावर्तीबद्दल येवलवाडीच्या नागरिकांनी त्यांची सवाद्य अशी तहसील कार्यालय ते येवडवाडी पर्यंत सवाद्य मिरवणूक काढली पाटोदा तहसीलदार निलावळे यांच्या अध्यक्षतेखाली एक छोटा खाली सत्काराचा कार्यक्रम करून संतोष बण व पांडुरंग नागरगोजे यांच सपत्नीक तहसील कार्यालय तर्फे यथोचित सत्कार करून त्यांना प्रेमाने निरोप दिला व त्यांच्या पुढील भविष्यातील कार्यकाळास शुभेच्छा दिल्या यावेळी तहसील कार्यालयाचे सर्व स्टाफ सह पाटोदा येथील नागरिक सर्व तलाठी मंडळ अधिकारी व तसेच पत्रकार उपस्थित होते

## विध्यार्त्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करुन डॉ.अण्णाभाऊ साठे जयंती डी.पी.आय.पक्षाकडून रुई येथे साजरी

**गेवराई /प्रतिनिधी** गेवराई तालुक्यातील रुई येथे आज दि. ०१/०८/२०२४ रोजी साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती डीपीआय पक्षाचे युवक गेवराई तालुका अध्यक्ष साईनाथ अडागळे यांनी जिल्हा परिषद शाळा रुई येतील विधार्त्यांना शालेय साहित्य वाटप करून जयंती साजरी केली.



पृथ्वी ही शेषनागाच्या शिरावर नसून कामगारांच्या तळहतावर वसलेली आहे परखड विचारधारा जोपासत संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अग्रेसर असणारे कामगारांच्या व्यथा माजी मैना गावाकडं राहिली माज्या जीवाची होतीय कायली या डफावर थाप मारून जगासमोर मांडणारे जगभरात ज्यांच्या कादंबरी व लेखन साहित्याच्या माध्यमातून पोहोचलेले तसेच दीड दिवसाची शाळा शिकून आपली छाप व किमया गाजवणारे साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त रुई येतील जिल्हा परिषद शाळा येथे डीपीआय पक्षाचे साईनाथ अडागळे यांच्याकडून शाळेतील विध्यार्थीना शैक्षणिक साहित्य वाटप करून सामाजिक उपक्रम राबून मोठया उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक वाघमारे यांनी अडागळे यांचे कौतुक करत शिक्षणाचे महत्व जाणत कुठलाही गाजावाजा व बॅनरबाजी न करता इतर खर्च टाळून तो शैक्षणिक साहित्यासाठी वापर करत स्तुत्य सामाजिक उपक्रम साठे जयंती निमित्त आयोजित करून गरजू विधार्त्यांना शालेय साहित्य वाटप केल्याबद्दल साईनाथ अडागळे यांचे शिक्षक वर्गाने व मुख्याध्यापक यांनी आभार मानले.यावेळी उपस्थित उप सरपंच सचीन खरवडे.,किसन अडागळे,जंबर सेख,बाबासाहेब जगदाळे,दिपक अडागळे,रोहीत अडागळे,कुणाल चव्हाण,आर एन चव्हाण,निखील चव्हाण,निखील माळी शाळेतील शिक्षक, विध्यार्थी तसेच गावातील नागरिक, समाजबांधव आदी होते.

# ग्रामीण भागातील शिक्षकांनी मुख्यालयी राहण्याबाबत जनहित याचिका




**वादळवार्ता/विशेष**

ग्रामीण भागातील शिक्षकांनी मुख्यालयी राहण्याबाबत दाखल जनहित याचिकेच्या अनुषंगाने राज्य शासनासह जिल्हा परिषदेला नोटीस बजावण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती किशोर संत यांच्या खंडपीठाने शुक्रवारी (दि.२६) दिले आहेत. शासनाच्या ९ सप्टेंबर २०१९ च्या परिपत्रकानुसार शासकीय कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक आहे. जेणेकरून ग्रामीण भागातील जनतेची कुठलीही गैरसोय होणार नाही. या परिपत्रकानुसार ग्रामीण भागातील शिक्षकांनी मुख्यालयी राहण्याबाबत आदेश देण्याची विनंती करणारी जनहित याचिका गंगापूर तालुक्यातील वडगाव-रामपुरी येथील गणेश बोराडे यांनी ॲड. रवींद्र गोरे यांच्यामार्फत दाखल केली आहे. त्याअनुषंगाने वरीलप्रमाणे आदेश देण्यात आला. या जनहित याचिकेवर २३ ऑगस्ट २०२४ रोजी पुढील सुनावणी होणार आहे.

का केली याचिका? वरील परिपत्रकाच्या अंमलबजावणी संदर्भात बोराडे यांनी १६ सप्टेंबर २०२२ ला राज्य आणि केंद्र शासनास निवेदन दिले होते. त्यात त्यांनी म्हटले होते की, जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षक तसेच तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक, वायरमन, आरोग्य सेवक हे मुख्यालयी राहत नाहीत. ते तालुका अथवा जिल्ह्याच्या ठिकाणी राहतात. त्यामुळे सर्वसामान्य जनतेची व शेतकऱ्यांची गैरसोय होते. यासंदर्भात आमदार प्रशांत बंब यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता व शिक्षकांनी मोर्चा काढला होता. मात्र, या निवेदनाची दखल न घेतल्यामुळे बोराडे यांनी जनहित याचिका दाखल केली आहे. याचिकेत केलेली विनंती ग्रामीण भागातील शासकीय कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याबाबतच्या ९ सप्टेंबर २०१९ च्या शासनाच्या परिपत्रकाची अंमलबजाणी करण्याचे तसेच या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने केलेल्या उपाययोजनांचा अहवाल न्यायालयात सादर करण्याचा आदेश द्यावा, अशी विनंती याचिकेत केली आहे. ॲड. गोरे यांना ॲड. चंद्रकांत बोडखे, पल्लवी वांगीकर, केदार पठाडे , शुभम शिंदे व अमरदीप नाईक सहकार्य करीत आहेत. शासनातर्फे सहायक सरकारी वकील महेंद्र नेरलीकर काम पाहत आहेत.

## बीड जिल्हा योगासन स्पोर्ट चॅम्पियन स्पर्धेत जिल्हा परिषद शाळा ढाकेफळ चे विद्यार्थी चमकले.

**केज/प्रतिनिधी**




नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन आणि ब्रिहंत महाराष्ट्र योगा परिषद अंतर्गत बीड जिल्हा योगासन स्पोर्ट्स चॅम्पियनशिप या स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ढाकेफळ चे विद्यार्थी सहभागी होऊन उत्कृष्ट कामगिरी केली. या शाळेतील पवन भरत थोरात आणि आणि सिद्धी जनक थोरात या विद्यार्थ्यांनी आर्टिस्टिक्स सिंगल या योग प्रकारात सहभाग घेतला होता उत्कर्ष भाऊसाहेब घाडगे आणि राजवीर महादेव थोरात या विद्यार्थ्यांनी ट्रॅडिशनल योगा या योग प्रकारात सहभाग घेतला होता दोन्ही प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले .कुमारी सिद्धी जनक थोरात या विद्यार्थिनीने अप्रतिम प्रदर्शन करत जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक पटकावलेला आहे आणि १६,१७,१८ ऑगस्ट तारखेला संगमनेर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय योगासनस्पर्धेसाठी ती पात्र झालेली आहे. या स्पर्धेसाठी योगा प्रशिक्षक श्रीमती , नेहरकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली मुख्याध्यापक श्री अंधारे सर व सर्व स्टाफ शिक्षक यांनी त्यांना सहकार्य केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

## अंमळनेर येथील संतमूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन सोहळ्याचा लाभ घ्यावा-गो.गो.मिसाळ सर तीन दिवसीय सप्ताह सोहळ्याचे आयोजन

**पाटोदा/प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील अंमळनेर येथील श्री गणेश मंगल कार्यालय भारत पेट्रोल पंपा जवळील संत मंदिरात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी सोमवार दि.५ बुधवार ते दि.७ ऑगस्ट २०२४ दरम्यान तीन दिवसीय सप्ताह व संत मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होत आहे.या सोहळ्याचा पंचक्रोशीतील ग्रामस्थ व भाविक-भक्तांनी बहुसंख्येने उपस्थिती दर्शवून लाभ घ्यावा व शोभा वाढवावी असे आवाहन आयोजन गोपाळराव गोविंदराव मिसाळ सर माजी जिल्हा परिषद सदस्य अंमळनेर गट,सत्यसेन गोपाळराव मिसाळ माजी उपसरपंच अंमळनेर,सौ.संगिता सत्यसेन मिसाळ माजी उपसभापती पाटोदा,डॉ. चित्रसेन गोपाळराव मिसाळ,डॉ.



अनिल सानप यांनी केले आहे. याविषयी माहिती अशी की,श्री बजरंग बली,संत भगवान बाबा,संत वामनभाऊ आदी संत-महंत देवतांच्या संतमूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन सोहळ्याची हे १० वे वर्ष असून हा भव्य-दिव्य सोहळा ह.भ.प.महंत विठ्ठल महाराज श्री क्षेत्र गहिनीनाथ गड,ह.भ.प.महंत शिवाजी महाराज श्री क्षेत्र नारायण गड,ह.भ.प.महंत डॉ. नामदेव शास्त्री श्री क्षेत्र भगवानगड,ह.भ.प.महंत महादेवानंद भारती महाराज श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान पिंपळवंडी यांच्या आशिर्वादाने व मार्गदर्शनाखाली चालू आहे.यानिमित्त संत मूर्ती मंदिरात सकाळी ४ ते ६ काकडा भजन,७ ते८ विष्णुसहस्रनाम व गीता पाठ,१० ते १२ गाथा भजन,४ ते ५ प्रवचन,सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ,६ ते ८ भोजन,रात्री ८ ते १० किर्तन,१० ते १२ संगीत भजन कार्यक्रम होईल.सोमवार दि.०५/०८/२०२४ रोजी रात्री ८ ते १० या वेळेत ह.भ.प. वाणीभूषण ज्ञानेश्वरजी महाराज तांबे नेवासा व मंगळवार दि.०६/०८/२०२४ रोजी युवा किर्तनकार ह.भ.प.शिवलीलाताई पाटील यांचे किर्तन आयोजित केले आहे. तसेच बुधवार दि.०७/०८/२०२४ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प.वेदांताचार्य विवेकानंद शास्त्री (कोकणरत्न) सिद्धेश्वर संस्थान शिरूर यांचे काल्याचे किर्तन होईल.त्यानंतर महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता होणार आहे. कार्यक्रमाच्या सांगता सोहळ्याला बुधवार रोजी अनेक संत- महंत, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह वारकरी भाविक -भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

## महापारेषण मधील विद्युत सहाय्यक कंत्राटी भरतीतील आर्थिक पिळवणूक थांबवा - एकनाथ मुंडे

**परळी/प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या वतीने महापारेषण मधील विद्युत सहाय्यक कंत्राटी भरती काढण्यात आली आहे. हजारो विद्यार्थी या भरती प्रक्रियेत सहभागी होऊन अर्ज भरत आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज करतांना त्यासाठी चलन भरावे लागते. आरक्षण दुरुस्ती झाल्यानंतर या भरती प्रक्रियेत काही बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे आता परत अर्ज भरण्याची वेळ आली आहे. त्यामुळे चलनाची रक्कम परत एकदा भरावी लागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक होत असून कोट्यवधींचा



भ्रष्टाचार होत असल्याची शक्यता आहे. याकडे शासनाने लक्ष देऊन हा प्रकार त्वरित थांबवावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष एकनाथ मुंडे यांनी केली आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्री यांना निवेदन देण्यात आले आहे. शासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महापारेषण मधील विद्युत सहाय्यक कंत्राटी भरतीतील होणाऱ्या आर्थिक पिळवणूक होत आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरत असताना रुपये २५० रुपयांचे चलन भरण्यास सांगितले जात आहे. अगोदर फॉर्म भरलेल्या हजारो उमेदवारांना परत चलन भरण्यास सांगितले जात आहे. यामुळे आर्थिक संकटात असलेल्या लाखो उमेदवारांकडून कोट्यवधी रुपयांची लूट केली जात आहे. संबंधित विषयात आपण लक्ष घालावे व ही लूट थांबवावी अशी आपणास विनंती आहे. अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असाही इशारा एकनाथ मुंडे यांनी दिला आहे.

## नाथ कनिष्ठ महाविद्यालय नाथापूर, ता.जि.बीड येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी




**बीड/प्रतिनिधी**

**दि.०१/०८/२०२४ रोजी महाविद्यालयात लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीचा कार्यक्रम उत्साहात पार पाडला गेला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ शिक्षक नांदे सर होते तर प्रमुख अतिथी श्री. गिराम सर होते. यावेळी ज्ञानेश्वरी हालकडे आणि केदळे सुनिल या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच गिराम सरांनी स्वातंत्र्य लढ्यातील आण्णाभाऊचे योगदान मांडले. अध्यक्षीय समारोपात नांदे सरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या चारित्र्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री. आजब सरांनी केले. यावेळी सर्व अध्यापक वर्ग, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.**

## समरगीत स्पर्धेत परळीच्या संघाला तृतीय पारितोषिक श्रमानेच उध्दार या गीताला मिळाले बक्षीस संघाचे उत्कृष्ट सादरीकरण




**परळी/प्रतिनिधी**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने गटस्तरीय समरगीत स्पर्धेचे लातुर येथील कामगार कल्याण भवनात बुधवारी (दि. ३१जुलै) आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत परळीच्या समरगीत संघाला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण जेष्ठ कवी योगिराज माने, कामगार कल्याण अधिकारी प्रसाद धस, शंकर जगतात, रूपाली नाईक, विजय धायगुडे, पत्रकार धीरज जंगले यांच्या उपस्थितीत झाले. परळीच्या समरगीत संघाने कामगारांच्या कामावर आधारित श्रमानेच उध्दार हे समरगीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. संघाने उत्कृष्ट सांघिक सादरीकरण केल्याने तृतीय क्रमांकांचे बक्षीस मिळविले. या संघात सुरसंगम संगीत विद्यालय व फाऊंडेशन शाळेच्या विद्यार्थिनीं कृतिका टाक, सिया तोतला, नेतल शर्मा, श्रीजा दहातोंडे, साक्षी सावजी, नेतल दाड, सिद्धी सानप, पुजा शिंदे, आरूषी होलानी, शिवानी सलगरे, वैभवी सावजी यांचा सहभाग होता. तर पेटीवादकाची साथ संगीत शिक्षक तुकाराम जाधव यानी दिली. आणी नैतिक गिरी यांनी तबलावादन केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077